# शिवराज दिवटेला न्याय मिळालाच पाहिजे, न्याय द्या अजित पवार न्याय द्या, अशा घोषणांनी परिसर दणाणला..!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २४० ■ सोमवार दि.१९ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 240 ■ Monday Dt.19 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे पालकमंत्री झाल्यापासून तिसऱ्यांदा बीड जिल्हा दौऱ्यावर!

# शिवराज दिवटेला मारहाण करणं चांगलंच अंगलट येणार; अजितदादांच्या पोलिसांना सूचना आरोपींना थेट मकोका?

## अजितदादांनी श्री वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास कामाची केली पाहणी!

बीड । प्रतिनिधी
राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. अजित पवार हे पालकमंत्री झाल्यानंतर तिसऱ्यांदा बीड जिल्हा दौऱ्यावर येत असून, परळी, अंबाजोगाई, बीड आणि गेवराई या चार मतदारसंघांत अजित पवार ११ तास असणार आहेत. परळीतून दाखल पोहोचून अजित पवारांनी आपल्या दौऱ्याची सुरुवात केली. परळीत दाखल होताच त्यांनी विविध विकास कामांचा आढावा घेतला. या दौऱ्यादरम्यान अजित पवार यांच्या सोबत भाजपच्या मंत्री पंकजा मुंडे आणि परळीचे आमदार धनंजय मुंडे हे देखील हजर होते. अजित पवार यांनी सर्वप्रथम वैद्यनाथाचे दर्शन घेऊन आपला दौरा सुरू केला. बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग परळी वैद्यनाथ क्षेत्राच्या विकास आराखड्यासाठी बैठक घेणार होते यासाठी ते मंदिराजवळ पोहोचले मात्र तिथे जात असताना मंदिराच्या पायऱ्या चढत असताना तिथलं काम व्यवस्थित नसल्याचं अजित पवार यांच्या लक्षात आलं आणि लगेचच त्यांनी कंत्राटदाराला चांगलंच फैलावर घेतलं. अजित पवार आपल्या स्पष्ट वक्तव्य आणि रोखठोक भूमिकेमुळे नेहमीच ओळखले जातात. त्याचीच अनुभूती दादा आज परळीत असताना आली. त्यानंतर उपमुख्यमंत्री पवार छत्रपती

पान २ वर

## आ.धनंजय मुंडे आणि आ.विजयसिंह पंडित यांना लाल दिव्यांची संधी द्या

### अजित पवार अंबाजोगाईतच, पण शिवराज दिवटेची भेट न घेताच निघून गेले! मराठा संघटनांकडून निषेध!



तुझा संतोष देशमुख पार्ट टू करू, अशी धमकी देत शुक्रवारी परळीत दहा ते बारा जणांच्या टोळक्याने शिवराज दिवटे या तरुणाला बेदम मारहाण केली होती. या हल्ल्यात जखमी झालेल्या शिवराज याच्यावर अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याच रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारतीत बैठकीसाठी आलेल्या अजित पवारांनी शेजारीच असलेल्या रुग्णालयात जाऊन शिवराज दिवटे यांची भेट न घेताच ते पुढील दौऱ्याला रवाना झाले. अजित पवार हे कोत्या मनाचे आहेत, असा आरोप मराठा संघटनांनी करत त्यांचा निषेध केला आहे.

## दादांच्या दौऱ्यामुळे नातेवाईकांना बसावे लागले जिल्हा रुग्णालयाच्या दारात?

### बीडमध्ये ऑपरेशन सिंदूर राबवा : अंजली दमानिया



अंजली दमानिया म्हणाल्या, जसे आपण ऑपरेशन सिंदूर सीमेवर केले होते, तसेच महाराष्ट्राच्या बीडमध्ये केले पाहिजे. बीडचा परळी म्हणजे आता दहशतीचा अड्डा झालेला आहे. आणि खरंच याला आता अतिशय गंभीरतेने घ्यायला हवं. कारण कालची जी मारहाण झाली त्याच्यात सगळे मुले अतिशय छोटी होती. १८ वर्षाच्या आसपासचे होते. जसा आपण ऑपरेशन सिंदूर सीमेवर केला होता तसाच महाराष्ट्राच्या बीडमध्ये केला पाहिजे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे. त्यांच्या या मागणीने एकच खळबळ उडाली आहे.

## रुग्णांना साधे जेवायला मिळाले नाही सकाळपासून पोलीस यंत्रणा तैनात!

### अजितदादा... आ.धनंजय मुंडे आणि आ.विजयसिंह पंडित यांना मंत्रिपदाची संधी द्या!





परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांना स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या प्रकरणामुळे आपल्या मंत्रिपदाचा नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यावा लागला होता. मात्र बीड जिल्हा भरात माजी पालकमंत्री असलेले धनंजय मुंडे यांची क्रेझ आजही कायम आहे. त्यामुळे त्यांना कॅबिनेट मंत्रीपदाची पुन्हा एकदा संधी द्यावी अशी मागणी होत आहे. व तसेच गेवराई विधानसभा मतदारसंघाचे तडफदार नेतृत्व सर्वांच्या मनातील आयडॉल आमदार विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी सार्वधिक मतांनी निवडून येण्याचा मान मिळवलेला आहे. आमदार विजयसिंह पंडित यांनी थोरले बंधू अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्यातील विकासाचे जाळे निर्माण करण्यासाठी सज्ज झाले आहेत. विविध विकास कामाचा शुभारंभ सध्या त्यांच्या हातून होत आहे. त्यांच्या या कार्याकडे पाहून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी आमदार विजयसिंह पंडित यांना राज्यमंत्री करावे अशी मागणी गेवराई तालुक्यातून होत आहे.

## विष्णू चाटेनी जामीन अर्ज मागे घेतला

### पुढील सुनावणी ३ जून रोजी

बीड । प्रतिनिधी
केज तालुक्यातील मसाजोग येथील पवनचक्की खंडणी व सरपंच देशमुख यांची हत्या प्रकरणी बीड जिल्ह्यासह अवघा महाराष्ट्र हादरला होता.या हत्येतील आरोपी बीड जिल्हा कारागृहात असलेले वाल्मीक कराड व इतर आरोपीची आज न्यायालयात सुनावणी पार पडली.
या सुनावणी दरम्यान सरकारी वकील व आरोपीचे वकील यांच्यामध्ये जवळपास दहा मिनिटे युक्तिवाद झाला. यामधील आरोपी असलेले विष्णू चाटे यांने मागील तारखेला देशमुख हत्या प्रकरणातून दोषमुक्त करण्यात यावे यासाठी अर्ज केला होता परंतु, आज तो जामीन अर्ज मागे घेण्यात आल्याची व पुढील सुनावणी तीन जून रोजी असल्याची माहिती मिळती वकिलांनी दिली.

## सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री, रोहित पवार अन् जयंत पाटलांना राज्यात संधी

सोलापूर । प्रतिनिधी
राज्यात एकीकडे दोन राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याची जोरदार चर्चा सुरू असतानाच आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मोठा दावा केला आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकच असल्याचे सांगत त्यांनी सुप्रिया सुळेंना केंद्रात मंत्रिपद देण्यात येईल, असे भाकीतच केले आहे. सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री तर जयंत पाटील आणि रोहित पवार यांना राज्यात मंत्री करायचे असल्याने याचा फटका छगन भुजबळ आणि गोपीचंद पडळकर या ओबीसी नेत्यांना बसणार असल्याचा दावा लक्ष्मण हाके यांनी केला आहे. या १० वर्षात पवार काका–पुतणे अमित शहांच्या दारात दिसत आहेत, अशी टीकाही हाके यांनी केली आहे.

## कुठलाच पात्र लाभार्थी घरकुल सर्व्हेपासून वंचित राहू नये : आ.संदीप क्षीरसागर

### सर्व ग्रामसेवकांनी खबरदारी घेण्याच्या कडक सूचना



बीड । प्रतिनिधी
प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या सेल्फ सर्व्हे ला ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळालेली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचण येत आहे. त्यामुळे कुठलाही लाभार्थी सर्व्हेपासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाने सर्व ग्रामसेवकांना कडक सूचना द्याव्यात, असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिले आहेत.
ग्रामीण भागातील पात्र नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मोबाइलद्वारे सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. तांत्रिक अडचणींमुळे आणि विलंबामुळे कोणताही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये याकरिता सेल्फ सर्व्हे करण्यासाठी प्रशासनाकडून मुदतवाढही देण्यात आली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक पात्र लाभार्थी हे अशिक्षित आहेत तसेच अनेकांकडे स्मार्टफोन नाहीत, आणि अनेकांना तांत्रिक माहिती नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचणी येत आहेत. या बाबींचा विचार करून गावपातळीवर, ज्या पात्र लाभार्थींना सेल्फ सर्व्हेबाबत अडचणी आहेत त्या लाभार्थींचा सर्व्हे ग्रामसेवकांनी करून द्यावा. एकही पात्र लाभार्थी सेल्फ सर्व्हेपासून वंचित राहू नये याची खबरदारी घेण्याचे कडक निर्देश ग्रामसेवकांना द्यावेत. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी बीड व शिरूर (का.) यांना दिल्या आहेत.




# खासदार बजरंग सोनवणे यांनी रुग्णालयात घेतली शिवराज दिवटेची भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



परळी तालुक्यातील अमानुष मारहाणीच्या घटनेत जखमी झालेला लिंबोटा येथील तरूण शिवराज दिवटे हा अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय रूग्णालयात उपचार घेत आहे. दि.१८ रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी त्याची रूग्णालयात जावून भेट घेत सर्व घटनाक्रम जाणून घेतला. शिवाय, घाबरू नको, मी सोबत आहे, असाही धीरही दिवटेला दिला. दरम्यान, गेल्या कांही वर्षात तयार झालेला परळी पॅटर्नचा बिमोड करण्यासाठी विशेष आयपीएस अधिकारी नेमून येथील गुंडगीरी मोडीत काढावी, अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली.

दोन दिवसांपुर्वी परळीतील अमानूष मारहाणीचा व्हिडीओ समोर आला होता. यात शिवराज टिवटे यास मारहाण करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात शिवराज दिवटे या तरूणावर उपचार सुरू आहेत. त्याठिकाणी जावून त्याच्या तब्येतीची विचारपूस केली आणि त्याला मिळत असलेल्या उपचाराबाबत संबंधित डॉक्टर व रुग्णालयाचे अधिष्ठाता यांचेकडुन माहिती घेतली. दिवटे कुटूंबियांना धीर दिला. त्यानंतर केज-अंबाजोगाई रोडवर झालेल्या कंटेनर अपघातात जखमी झालेल्या रुग्णांचीही भेट घेतली. डॉक्टरांशी चर्चा करून सगळ्यांना योग्य ती वैद्यकीय मदत मिळतेय ना, याची खातरजमा केली. यावेळी बोलताना खा.सोनवणे म्हणाले, परळी व परिसरात दहशतीचा धंदा निर्माण करण्याकडे नवतरुणांचा कल वाढत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. हे थांबवायचे असेल तर कायद्याचे राज्य स्थापण होणे गरजेचे आहे.

या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी एक स्वतंत्र आयपीएस अधिकारी नेमण्यात यावा, परळीतील सर्वच वादग्रस्त पोलिस अधिकारी यांच्या तातडीने बदल्या करावत्यात, ऋशिवराज दिवटे प्रकरणातील सर्व आरोपींवर कठोरात कठोर शासन करावे, अशा मागण्या राज्य सरकारकडे करत आहे. तर दिवटे परिवाराला पोलिस संरक्षण देण्यात यावे. त्यांना रूग्णालयातही धमकावण्याचे काम सुरू आहे. त्याकडे पोलीस प्रशासनाने गांभिर्याने पहावे अशी मागणी केली. राज्य सरकारकडे करण्यात आलेल्या मागण्या आज संध्याकाळपर्यन्त मान्य कराव्यात, अन्यथा बीड जिल्हा उद्या बंद करण्यासाठी जिल्हा बंदची हाक देण्यात येईल, असा इशाराही यावेळी खा.सोनवणे यांनी दिला. याच बरोबर बीड जिल्ह्यामध्ये जे चाललंय ते अत्यंत दुर्दैवी आहे. बीड जिल्ह्यात अनेक घटना घडतात की या गुन्ह्यांची पाळेमुळे परळीतील विशिष्ठ लोकांच्याकडे सापडतात. अतिशय वाईट कृत्य करणारे तरुण परळी शहरात आणि परिसरात तयार होत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. स्व. संतोष देशमुख यांचे ज्या दिवशी अपहरण आणि मर्डर झाला त्या दिवसापासून मी संसदेत व बाहेर आवाज उठवत आहे. सर्व आमदार आणि सामाजिक कार्यकर्ते बोलत आहेत, मात्र या गुंड प्रवृत्तीला रोखण्यासाठी पोलिसांनी क्रियाशील पुढाकार घ्यायला हवा, असेही खा.सोनवणे म्हणाले.

परळी पॅटर्नसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे आयपीएस लेव्हलचा एक विशेष अधिकारी नेमण्यात यावा अशी मागणी करणार आहे.परळी मध्ये १९९२ पासून सत्तेने मस्तावलेली प्रवृत्ती आहे. सत्तेचा राजाश्रय मिळत असल्याने हे लोक दादागिरी आणि गुंडगिरी करीत आहेत.

**बोगस पिकविमा उचलण्यातही हेच लोक**

बोगस पिकविम्याचे लाखो नव्हे तर करोडो रुपये काही धेंडानी उचलले आहेत. नांदेड, लातूर, परभणी अशा चारपाच जिल्ह्यात बोगस पीकविमा भरला आहे. याची सर्वांकडे ऑफलाईन पद्धतीने तक्रार केलेली आहे, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी बीड जिल्ह्याच्या गृहखात्यावर आणि जेल प्रशासनावर बोलले पाहिजेत. बीडचे जेल प्रशासन हे जास्तच बोगस प्रशासन आहे, याचा उल्लेखही खा.सोनवणे यांनी केला.

## दिवटे मारहाण प्रकरणातील सर्वांना अटक करून आरोपींना मकोका लावा : कराड

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

सप्ताहातील भांडण सोडवण्याच्या कारणावरुन परळी तालुक्यातील लिंबोटा येथील युवक शिवराज दिवटे यास २० जणांनी मारहाण केल्याच्या घटनेनंतर रविवार दि.१८ रोजी भगवान सेनेचे सरसेनापती, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जेष्ठ नेते फुलचंद कराड यांच्या नेतृत्वाखाली लिंबोटा येथे परळी-बीड महामार्गावर रास्तारोको आंदोलन करण्यात आले. याप्रकरणातील आरोपींना मकोका लावा अशी मागणी करत यासाठी आपण गावकऱ्यांना सोबत घेवुन उपमुख्यमंत्र्यांना निवेदन देणार असल्याचे कराड यांनी सांगितले.

परळी शहरातील जलालपुर येथील सप्ताहात आलेल्या युवकास तु त्या भांडणात होतास या कारणावरुन २० जणांनी त्यास रत्नेश्वर टेकडीवरील झाडीत रिंगण टाकुन बेदम मारहाण करत जखमी केल्याची घटना दि.१६ मे रोजी घडली होती. याप्रकरणी संभाजीनगर पोलिसांनी सात जणांना ताब्यात घेतल्यानंतर पाच जणांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. यापैकी दोघे अल्पवयीन असल्याने त्यांची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली होती. या घटनेतील उर्वरीत आरोपींना अटक करावी त्यांच्यावर मकोका लावावा व अशा घटना वारंवार घडु नयेत पोलिसांनी गुंडांना अटकाव घालावा या मागणीसाठी फुलचंदराव कराड यांच्या नेतृत्वाखाली लिंबोटा ग्रामस्थ रविवारी सकाळी एकत्रित येत चार तास रास्तारोको केला. यामुळे परळी-बीड रस्त्यावरील वाहतूक खोळंबली होती.

शिवराज याचे आजोबा लिंबोट्याचे माजी सरपंच होते व ते माझे सहकारी होते.मारहाण झाल्यानंतर शिवराज याची अंबाजोगाई दवाखान्यात भेट घेवुन पोलिस अधीक्षकांकडे आरोपींना अटक करण्याची मागणी केली. रविवारी रास्तारोको सुरु झाल्यानंतर ग्रामीण पोलिस ठाणे, संभाजीनगर पोलिस ठाण्याचे पो.नि. व गिरधावर यांनी निवेदन स्वीकारल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

पान १ वरून...

## शिवराज दिवटेला मारहाण करणं चांगलंच अंगलट येणार...

शिवाजी महाराज चौकाजवळील शासकीय विशेष अतिथी विश्रामगृहामध्ये बैठकीसाठी हजर झाले. दरम्यान, विश्रामगृहाच्या बाहेर मराठा सेवकांनी एक मराठा लाख मराठाच्या घोषणा देत शिवराज दिवटे यांना न्याय मिळालाच पाहिजे, अशी मागणी केली. न्याय द्या न्याय द्या, अजित पवार न्याय द्या, अशा घोषणांनी परिसरात दणाणून गेला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीडचे पालकमंत्री झाल्यानंतर प्रथमच परळी दौऱ्यावर आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून त्यांचे जंगी स्वागत केलं गेलंय. या वेळी परळी शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक,राणी लक्ष्मीबाई टावर आणि वैद्यनाथ मंदिर परिसरामध्ये फुलांचे हार क्रेनवर लावण्यात आले होते. उपमुख्यमंत्री पवार यांनी श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास कामाची केली पाहणी. तसेच आज गेवराईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित सभा होणार असून विविध विकास कामाचे शुभारंभ होणार आहेत. यामुळे अजित पवार हे पालकमंत्री झाल्यापासून गेवराई शहरात पहिल्यांदाच दौऱ्यावर आले आहेत. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली भावी आमदार म्हणून ओळखले जाणारे महेश दाभाडे यांच्यासह अनेक समर्थकांचा पक्षप्रवेश देखील होणार आहे.

**अजित पवार यांच्या बीड दौऱ्याचा सामान्यांना फटका!**

उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार आज बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात अजित पवार बीडच्या शासकीय रुग्णालयाला भेट देण्यासाठी गेले. अजित पवारांच्या याच व्हीआयपी दौऱ्यामुळे रुग्णालयाचे सुरक्षारक्षक आणि पोलिसांनी नागरिकांना सकाळी साडेआठ वाजेपासून रुग्णांच्या भेटीसाठी जाण्यास रोखण्यात आलं. रुग्णालयात रुग्णांचा डबा घेऊन देखील दिले जाऊ नव्हते. कुणाची आई, तर कुणाचा लेकरू, तर कुणाची सून रुग्णालयात उपचार घेत होती.

पण जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री असलेल्या अजित पवारांचा व्हीआयपी दौरा पाहता पोलीस कुणालाच आतमध्ये सोडायला तयार नव्हते. रुग्णांचे नातेवाईक गयावया करत होते, काहींना अश्रू अनावर झाले. पण दादाचा दौरा म्हटल्यावर बिचारे पोलीस तरी काय करतील. बरं रुग्णांच्या नातेवाईकांना पाच तास रुग्णालयाच्या बाहेर उभं करून देखील अजित पवार त्या कार्यक्रमाला आलेच नाहीत. या प्रकारावरुन रुग्णांच्या नातेवाईकांनी मात्र संताप व्यक्त केला.

**खाजगी बँकांच्या प्रश्नांवर अजितदादांचे मौन?**

बीड जिल्ह्यात अनेक खाजगी बँका आहेत परंतु अनेक संबंधित चेअरमन बँक बंद करून फरार आहेत यामुळे ठेविदारांसह खातेदार मोठ्या संख्येने संकटात सापडले आहेत गोरगरीब ठेविदारांनी आपली ठेवी सुरक्षित राहावी म्हणून खाजगी बँकेच्या माध्यमातून ठेवले आहेत तसेच खातेदारांनी देखील आपली रक्कम अगदी बँकात ठेवले याचा फायदा संबंधित चेअरमन यांनी घेऊन ठेवीदारांवर आत्महत्या करण्याची वेळ आणली आहे तसेच अनेक ठेविदारांनी व खातेदारांना आर्थिक झळा सोसावी लागत आहे मात्र जिल्हा सहकार निबंधक कार्यालयाकडून कुठलेही कारवाई आतापर्यंत केलेली नसल्याने उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार हे बीड जिल्हा दौऱ्यावर असुन या खाजगी बँकांवर आवाज उठून गोरगरीब असणाऱ्या ठेविदाराचे, खातेदारांचे पैसे परत मिळून न्याय द्यावा अशी मागणी होत आहे.

## वसई-विरार पालिकेतील उपायुक्त रेड्डी यांचं अखेर निलंबन

वसई विरार । प्रतिनिधी

वसई-विरार शहर महापालिकेतील नगररचना विभागातील वादग्रस्त आणि भ्रष्टाचाराच्या आरोप असलेले उपायुक्त वाय. एस. रेड्डी यांना अखेर निलंबित करण्यात आलं आहे. महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी ही कारवाई केली आहे. संबंधित पदासाठी नव्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची मागणी महाराष्ट्र शासनाकडे करण्यात आली आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, ही कारवाई १४ मे रोजी सक्तवसुली संचालनालयाने केलेल्या मोठ्या छापेमारीनंतर करण्यात आली आहे. नालासोपारातील ४१ अनधिकृत इमारतींच्या प्रकरणी, ईडीने एकाचवेळी १३ ठिकाणी छापे टाकले होते. या मोहिमेतील सर्वात मोठा खुलासा वाय.एस. रेड्डी यांच्या हैदराबादमधील घरातून झाला. छाप्यात ८.६ कोटींची रोख रक्कम तसेच २३.२५ कोटींचे हिरेजडित दागिने, तसेच सोने व चांदी जप्त करण्यात आले आहे. ईडीच्या या तपासातून वसई-विरार महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा थेट सहभाग उघड झाला आहे. ईडीने जप्त केलेल्या दस्तऐवजांतून महापालिकेतील भ्रष्टाचाराचं मोठं जाळं उघडकीस आलं असून, भविष्यात आणखी अधिकाऱ्यांची नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे महापालिकेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे.

## जन आक्रोश महाआंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : सचिन क्षीरसागर

जालना । प्रतिनिधी



अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करावी यासह प्रलंबित मागण्यांसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने मंगळवारी (ता. २०) सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत मुंबई येथील आझाद मैदानावर जनअक्रोश महाआंदोलन करण्यात येणार असून या आंदोलनात मातंग समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन लहुजी शक्ती सेनेचे युवक प्रदेशाध्यक्ष सचिन क्षीरसागर यांनी केले आहे.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात सचिन क्षीरसागर यांनी म्हंटले आहे की, अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यासाठी समाजाने अनेक वर्षांपासून दिलेल्या लढाईला अखेर गतवर्षी सर्वोच्च न्यायालयात न्याय मिळाला. आरक्षणाची वर्गवारी करून अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना दिले होते. अद्यापही त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, येत्या जून २०२५ पासून उपवर्गीकरण करून लागू करावे, यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील पाच लक्ष समाज बांधव आझाद मैदान येथे एक दिवसीय जन आक्रोश महाआंदोलन करणार आहेत. या आंदोलनात लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक विष्णू कसबे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व लहुस सैनिक संपूर्ण ताकदीने सहभागी होणार असून मातंग समाज बहुल वस्त्यांमध्ये जाऊन बैठकांद्वारे महाआंदोलनाच्या यशस्वीतेसाठी नियोजन केले जात आहे. असे नमूद करत समाज बांधवांनी आपल्या हक्काच्या लढाईसाठी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभाग नोंदवावा असे आवाहन सचिन क्षीरसागर यांनी केले आहे.

## आज सोन्याला पुन्हा झळाळी, तर चांदीच्या दरात घसरण

मुंबई । प्रतिनिधी

सोन्याची खरेदी करणाऱ्यांसाठी थोडी निराशाजनक बातमी आहे. तर चांदीची खरेदी करणाऱ्यांसाठी दिलासा देणारी बातमी आहे. सोन्याच्या दरात वाढ झाली आहे. तर चांदीच्या दरात घसरण झाली आहे. गेल्या आठवड्यात सोन्याच्या किमतीत सुमारे ४ टक्क्यांनी घसरण झाल्यानंतर, आज म्हणजेच सोमवार दिनांक १९ मे २०२५ रोजी सोन्याच्या दरात वाढ जालीय. मुंबईत २२ कॅरेट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम ८७२०० रुपये आहे, तर २४ कॅरेट सोन्याचा दर ९५१३० रुपयांना आहे. तथापि, मुंबईत चांदीचा भाव १०० रुपयांनी घसरून ९६९०० रुपये प्रति किलो झाला.

एमसीएक्सवर, सोने ०.६५ टक्क्यांनी वाढून ९३०४२ रुपये प्रति दहा ग्रॅमवर विकले जात आहे, तर चांदी देखील ०.२६ टक्क्यांनी वाढून ९५५७० रुपये प्रति किलोवर विकली जात आहे.

जागतिक बाजारपेठेत सोन्याच्या किमतीत सुमारे एक टक्क्यांची वाढ झाली आहे. याचे कारण अमेरिकन डॉलरचे कमकुवत होणे आहे. अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेझंट यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफचा पुनरुच्चार केल्यानंतर व्यापारातील तणाव कमी झाल्यामुळे गुंतवणूकदारांचा सोन्यातील रस वाढला आहे.

तुमच्या शहरात काय आहेत सोन्याचे दर?

जयपूरमध्ये २२ कॅरेट सोने ८७३५० रुपये आणि अहमदाबादमध्ये ८७६०० रुपयांना विकले जात आहे. त्याचप्रमाणे, पटना येथे सोने ८७६०० रुपयांना विकले जात आहे, तर मुंबई, हैदराबाद, चेन्नई, बंगळुरु आणि कोलकाता येथे सोने ८७५५० रुपयांना विकले जात आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील दर, आयात शुल्क आणि कर आणि विनिमय दरातील बदलांमुळे सोने आणि चांदीच्या किमतीतील हा बदल वाढत किंवा कमी होत राहतो. या घटकांमुळे, देशभरात सोने आणि चंद्राची किंमत निश्चित केली जाते. जर आपण भारताबद्दल बोललो तर ते सांस्कृतिक दृष्टिकोनातून देखील खूप महत्वाचे आहे, विशेषत: सण आणि लग्न समारंभांमध्ये त्याचे महत्त्व वाढते.

# एल्गार मेळाव्यातून राज्यव्यापी कर्जमुक्ती आंदोलनाची मशाल पेटली

## कर्जमुक्ती द्या, अन्यथा मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही : रविकांत तुपकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना कर्जमुक्तिचे खोटे आश्वासन देणाऱ्या राज्यातील महायुती सरकार विरोधात क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन छेडले जाणार आहे. याच अनुषंगाने राज्यात विविध जिल्ह्यात कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. शनिवार, दि.१७ मे रोजी अंबाजोगाई तालुक्यातील मांजरा बेल्ट पट्ट्यातील देवळा येथे आयोजित कर्जमुक्ती एल्गार मेळाव्यात क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी राज्य सरकार विरोधात शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती मिळविण्यासाठी मशाल पेटवून राज्यव्यापी आंदोलनाचे रणशिंग फुंकले. सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात दुर्लक्ष केले तर जून महिन्यामध्ये राज्यभरात आक्रमक आंदोलन छेडले जाईल, राज्यातील कुठल्याही मंत्र्याला रस्त्यावर फिरू दिले जाणार नाही, आता शेतकरी स्वस्थ बसणार नाहीत. राज्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या सरकारने याची वेळीच दखल घ्यावी अन्यथा मुंबई येथे मंत्र्यांना मंत्रालयातील त्यांच्या दालनाताच घेराव घालू, कुठल्याही परिस्थितीत राज्यातील शेतकरी कर्जमुक्त होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार असल्याच्या निर्धार रविकांत तुपकर यांनी यावेळी व्यक्त केला.

कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याच्या विचारमंचावर संयुक्त अध्यक्षस्थानी ह.भ.प.लालासाहेब (नाना) पवार आणि देवळा गावचे सरपंच रावसाहेब (नाना) यादव हे होते. कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याला विशेष अतिथी म्हणून शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदासराव आपेट, बीड जि.प.चे माजी शिक्षण व आरोग्य सभापती राजेसाहेब देशमुख, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, शेतकरी नेते अच्युतराव गंगणे, राज्य कोअर कमिटीचे सदस्य सत्तार पटेल, लातूर





जिल्हाध्यक्ष अरूण कुलकर्णी, मराठा सेवा संघाचे बीड जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव, संभाजी ब्रिगेडचे (बीड पूर्व) जिल्हाध्यक्ष प्रवीण उत्तमराव ठोंबरे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनुरथ काशीद, नवनाथ शिंदे, रामराव बाबा लोमटे, विष्णु काका शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्याचे प्रास्ताविक मेळाव्याचे निमंत्रक तथा क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी केले.

यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांशी संवाद साधताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत. शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतकऱ्यांचे मरण दारात आहे अशा परिस्थिती मध्ये कुठलाही पक्षीय अभिनिवेश न बाळगता आम्ही सर्वजण शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभा राहू व शेतकरी चळवळीची वज्रमूठ आवळू असे आश्वासन देशमुख यांनी दिले. तर यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी न्याय मिळवण्यासाठी शेतकरी संघटनेने दिलेल्या एक कलमी कार्यक्रमाची कृती करण्याची गरज असून देवळा परिसरात यापूर्वी झालेल्या ऐतिहासिक ऊसाच्या झोनबंदी आंदोलनाच्या आठवणी जाग्या करून आगामी कर्जमुक्ती आंदोलनात मांजरा बेल्ट मधील शेतकरी मागे राहणार नाहीत. याची दक्षता घेण्याचे आवाहन शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदासराव आपेट यांनी उपस्थितांना केले.

तसेच याप्रसंगी गावगाड्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या तरूण मुलांनी आगामी कर्जमुक्तीच्या आंदोलनात उतरून आपल्या मायबाप शेतकऱ्यांचा परत आत्मसन्मान मिळविण्यासाठी हीच एकत्र येण्याची योग्य वेळ आहे. आपण सर्वच युवा शेतकऱ्यांनी हे आंदोलन ताकदीने पुढे नेण्याचे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी आपल्या प्रास्ताविकात केले. कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याच्या यशस्वितेसाठी अरूण आबा पवार, भास्करराव आगळे, नारायणराव मुळे, ऍड.राजेश शिंदे यांनी पुढाकार घेतला. कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याला मांजरा ग्रीनबेल्ट मधील विविध गावांतील शेतकरी, युवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.सुरेश धस पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर दडपशाहीवर मुग गिळून गप्प का?

बीड | प्रतिनिधी

महोदय आ. सुरेश आण्णा धस आपणास ईमेल द्वारे पाठवुन बीडकरांसाठी खुले पत्र लिहिण्यास कारण की आपण काल दि.१८ शनिवार रोजी परळी तालुक्यातील लिंबोटा गावातील शिवराज दिवटे या तरूणाला बेदम मारहाण करण्यात आली. अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात जाऊन शिवराज दिवटे यांची भेट घेतली आणि तब्येतीची विचारपूस केली. आण्णा आपल्या सारख्या संवेदनशील लोकप्रतिनिधींचे विशेष आभार आणि अभिनंदन. तुमचं विशेष अभिनंदन करून जाता जाता एक विचारायचं होतं आणि विनंती सुद्धा करायची एक बीडकर म्हणून.

विचारायचं हेच कि पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्यांकडून पोलिस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही होते,खंडणीचे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जाते. आणि दुसऱ्या दिवशी पाटोदा तालुक्यातील दासखेड ग्रामपंचायत अंतर्गत बेडुकवाडी येथील शेतकऱ्यांवर खोटे खंडणीचे गुन्हे दाखल होतात. नंतर पुन्हा दोन दिवसांनी पाटोदा तालुक्यातील जवळाला येथील शेतकरी हे प्रशासकीय अधिकारी पवनचक्की कंपन्यांना शेतकऱ्यांवर खंडणीचे गुन्हे दाखल करण्याचे सल्ले देतात, पाटोदा तालुक्यातील धनगरजवळका येथील शासकीय साठवण तलावावर अतिक्रमण करून रेन्यू पावर कंपनीने ४-५ कोटी रुपये खर्चून उपकेंद्र केले आहे वर्षभरापूर्वी विभागीय दैनिक पुण्यनगरीने जवळपास ७ भाग प्रसिद्ध केले आहेत. तुम्ही आता इलेक्ट्रॉनिक मिडियात जास्त दिसता त्यामुळे दैनिकात आलेल्या बातम्या वाचता कि नाही याबद्दल शंका आहे असो.



आता इलेक्ट्रॉनिक मीडिया खाजगीत पवनचक्की कंपन्यांचे मालक मोठमोठाले राजकीय पुढारी आणि उद्योगपती आहेत म्हणून खालुन जरी बातम्या पाठवल्या तरी वर लावत नाहीत असं विनम्रपणे सांगतात अर्थात अपवाद म्हणून काही टीव्ही चॅनेलवर आल्या आहेत त्यांचे आभार आणि जर विधानपरिषदेच्या उपसभापती माननीय निलमताई गोऱ्हे पत्रकार परिषदेत सर्व शिवसेनाप्रमुख (शिंदे गट) यांच्या समोर दैनिक प्रजापत्र चे संपादक संजयजी मालाणी सर, जिल्हा शासन आणि पोलिस प्रशासन यांच्याकडून शेतकऱ्यांच्या लिखित तक्रारी नंतरही बाजु ऐकुन घेतली जात नाही. याविषयी प्रश्न विचारला जातो तेव्हा विषय टाळतात तसेच दैनिक लोकमत बीड जिल्हा प्रतिनिधी सोमनाथ खताळ यांनी तुमच्या जिल्हाप्रमुखांनी यासंदर्भात तक्रारी केल्या आहेत हे सांगितल्यावर ते हयात आहेत हेच भरपूर त्यांचे आभार अशी प्रतिक्रिया देतात तेव्हा आणखी पुरावा काय द्यावा.

आ.सुरेश आण्णा धस पाटोदा तालुक्यातील पवनचक्की कंपन्यांकडून पिडीत शेतकऱ्यांबद्दल असंवेदनशीलता का?

आ.सुरेश आण्णा धस यांची प्रतिमा बेधडक सर्व सामान्य माणसाला न्याय देताना प्रसंगी कायदा मोडून उदाहरण द्यायचे झाले तर कोरोना कालावधीत ऊसतोड मजुरांच्या गाड्यावर हल्ला झाला होता तेव्हा स्वत:वर गुन्हा दाखल करून घेऊन मदतीला धावले होते. असे असंख्य उदाहरणे तुमचे समर्थक सांगतील. परळी तालुक्यातील गुंडगिरी बाबत धावपळ करत मिडीयावर पोपटासारखं बोलताना पवनचक्की कंपन्यांकडुन जिल्हा आणि पोलिस प्रशासन यांच्याकडून शेतकऱ्यांवर होणाऱ्या दडपशाही बदल अवाक्षर बोलत नाहीत हा मला पडलेला प्रश्न आहे. आपणास नम्र विनंती आण्णा आपण शेतकऱ्यांना न्याय द्यावा यापूर्वी मी आपणास ईमेलद्वारे लेखी निवेदन दिले आहे. आज आढावा बैठकीत पालकमंत्री बीड अजितदादा समोर विषय मांडावा तसेच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना विषय मांडा.

..ही आमची शेवटची नम्र विनंती : डॉ.गणेश ढवळे

आज पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांचा बीड दौरा असुन आढावा बैठक आहे. आपण पवनचक्की कंपन्यांकडुन जिल्हा आणि पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने आर्थिक आणि मानसिक पिळवणूक हा विषय मांडावा हि नम्र विनंती यापुढे आम्ही विषय आपणापुढे मांडणार नाही. देवेंद्रजी फडणवीस आपले जवळचे असुन आपले ऐकतात असा आम्हाला ठाम विश्वास आहे. त्यामुळे हा विषय आपण मुख्यमंत्री महोदयांच्या कानी घालुन शेतकऱ्यांना न्याय द्यावा. हि शेवटची नम्र विनंती आणि आपणास ईमेल सुद्धा करत आहे.

## प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत शेख अल्फियाने मिळविला प्रथम क्रमांक; पण पुढच्या शिक्षणाचे काय?

बीड | प्रतिनिधी



वडील नाही, नियमित शाळा नाही, खाजगी शिकवणी नाही, घरची आर्थिक परिस्थिती चांगली नाही असा सगळा नन्नाचा पाढा असतानाही अल्फिया जावेद शेख या विद्यार्थिनीने स्वअभ्यासावर इयत्ता दहावीची परीक्षा देऊन ६३% गुण घेत प्रथम क्रमांक मिळविला आहे.

अल्फिया जावेद शेख ही विद्यार्थिनी बालपणापासूनच पित्रछत्रापासून पारखी झालेली आहे. आई मिळेल ते काम करून स्वत:सह अल्फीयाचा उदरनिर्वाह करीत आहे. आईने तिला शिक्षण मिळावे म्हणून बीड शहरातील नामांकित अनुदानित उर्दू शाळेत टाकले खरे मात्र ती नववीत असताना त्या शाळेतील एका शिक्षकासोबत अनेक शिक्षीकांचे अनैतिक प्रकार माध्यमांमुळे समाजासमोर आले. यामुळे अनेक पालकांसोबतच अल्फियाच्या आईचाही विश्वास डगमगला. बिन बापाच्या असलेल्या आपल्या लेकीला काही बरे वाईट होऊ नये म्हणून नववीचे पूर्ण वर्ष त्यांनीही इतर मुलींसारखे अल्फीयाला शाळेत पाठविले नाही. यामुळे तिच्या नियमित शिक्षणात खंड पडला. मात्र पुढच्या वर्षी ती दहावीत गेल्यानंतर शाळेतीलच काही चांगले शिक्षक आणि शिक्षिकांनी तिच्या आईला शाळेत बोलावून तिला शाळेसह शाळेतील शिक्षक शिक्षिकांच्या बाबत विश्वास दिला. तेव्हा तिच्या आईचा विश्वास कसातरी स्थिरस्थावर झाल्याने तिने या शाळेत अल्फीयाला पाठविणे सुरू केले. तरीही पूर्वी सारखा विश्वास मनात नव्हता. एक प्रकारची भीती होतीच. शाळेची अशी अवस्था असताना आणि घरची आर्थिक स्थितीही बरी नसल्याने तिला कोणतीही शिकवणी खाजगी क्लासेस मधून लावता आली नाही. अशा अवस्थेत कसेबसे दहावीचे वर्ष सरले आणि अल्फियाने दहावीची परीक्षा दिली. याचा नुकताच निकाल लागला आणि अल्फियाने ६३% गुण घेऊन दहावीत प्रथम क्रमांक पटकावला. ती यापुढेही चांगले शिक्षण घेऊ इच्छिते मात्र आर्थिक परिस्थितीचे काय? असा प्रश्न तिच्यासह आई समोर उभा आहे.




वडवणी शहराजवळील चिंचवण रोडवरील रेल्वे उड्डाणपुलाखाली पावसाने पाणी मोठ्या प्रमाणात साचत आहे त्यामुळे पादचाऱ्यांना आणि वाहनधारकांना त्रासाला सामोरे जावे लागत असून या पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## कोविड वारिअर रेणुका फाउंडेशनच्या वतीने अनाथालयात अन्नदान व शालेय साहित्याचे वाटप

माजलगाव | प्रतिनिधी

येथील कोविड वारिअर रेणुका वाघमारे यांच्या तिसऱ्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त वडवणी तालुक्यातील ढेकणमोहा येथील अनाथालयातील पसायदान मुलांना खाउ, शालेय साहित्य तसेच एक आज दि. १६ मे २०२५ रोजी करण्यात आले. येथील रेणुका अभिमन्यु वाघमारे/गवळी या शासकीय रुग्णालयात नर्स म्हणुन कार्यरत होत्या तर कोरोना काळातही त्यांनी उल्लेखनिय कार्य केलेले आहे. या काळातच त्यांना देखिल कोरोनाची लागण झाली आणि यातच त्यांचा मृत्यु झाल्याची दु:खद घटना २०२१ मध्ये घडली. तेंव्हापासुन वाघमारे कुटूंबीयांनी कोविड वारिअर रेणुका फाउंडेशनची स्थापना केलेली असुन त्या फाउंडेशनच्या अंतर्गत विवीध समाजोपयोगी उपक्रम राबविलेले



आहेत.

यामध्ये संविधान दिनानिमीत्त सर्व शासकीय कार्यालयात संविधानाची प्रत वाटप, रक्तदान शिबीर, शासकीय रुग्णालयात फळ वाटप, शासकीय रुग्णांलयातील गोर, गरिब, गरजुवंत रुग्णांना आर्थिक मदत असे विवीध सामाजिक उपक्रम राबवित त्यांच्या स्मृती जपण्याचे काम केले आहे. यावर्षी देखिल स्व. रेणुका वाघमारे-गवळी यांच्या चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त वडवणी तालुक्यातील ढेकणमोहा येथील पसायदान अनाथालयातील मुलांना खाउ, शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी फाउंडेशनचे सचिव रमेश गवळी, अध्यक्ष अनिकेत वाघमारे, पसायदानचे अनाथालयाचे श्री. दराडे, श्रीमती दराडे व अनाथालयातील चिमुकले व वाघमारे कुटूंबीय उपस्थित होते. दरम्यान मिळालेल्या खाउने चिमुकल्या अनाथ विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमलले होते.



## आवरगावचे आदर्श सरपंच अमोल जगताप यांना लोकमत सरपंच अवॉर्डस ने सन्मानित

धारूर | प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील आदर्श गाव आवरगाव येथील सरपंच अमोल जगताप हे नेहमीच सामाजिक कामात अग्रेसर असतात तसेच विविध उपक्रमात त्याचा नेहमी सहभाग असतो तसेच त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित ही केलेले आहे. त्यातच नुकत्याला पार पडलेल्या लोकमत सरपंच अवॉर्डसने सन्मानित करण्यात आले आहे.

शैक्षणिक सुविधासाठी विविध प्रकारे प्रत्येक विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण व सुविधा मिळाव्यात यासाठी त्याचे नेहमीच प्रयत्न असतात त्यांनी गावातील शाळेसाठी कॉम्प्युटर लॅब सुद्धा चालु केलेली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला तंत्रज्ञान विषयी माहिती मिळावी इत्यादी गोष्टीसाठी च शैक्षणिक सुविधा मुळे त्यांना त्यांचे कार्य पाहून लोकमत सरपंच अवॉर्डस ने सन्मानित करण्यात आले.

## लोकनाट्य केंद्रात हाणामारी, चार दिवसांनी चौघांविरोधात गुन्हा नोंद

वाशी | प्रतिनिधी

तालुक्यातील पिंपळगाव (क) परिसरात असलेल्या तुळजाई लोकनाट्य केंद्रात बुधवारी (दि.१४) पहाटे तीन वाजता झालेल्या हाणामारी प्रकरणी शनिवारी (दि.१७) चौथ्या दिवशी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाण्याची सीलबंद बाटली घेतल्यानंतर त्याच्या दरावरून लोखंडी रॉड, गज, लाकडी दांडक्याने हाणामारीची घटना घडली होती. यात निखिल सपकाळ, आकाश जाधव (बीड) हे दोघे जखमी झाले होते.

त्यांच्या उपचार चालू असल्याने शनिवारी त्यांच्या जवाब मिळाला आहे. अशोक हरिभाऊ गायकवाड (रा. नळवंडी जि. बीड) यांनी वाशी पोलिस ठाण्यात 'पाण्याच्या बाटलीच्या दरावरून भांडण होऊन मारहाण केल्याची फिर्याद दिली आह. यावरून धनंजय मोटे, मन्सूर शेख, सिद्धांत मोटे, विनोद मोटे व इतरांनी (सर्व रा. तुळजाई कला केंद्र पिंपळगाव (क) यांच्याविरोधात वाशी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेमुळे पोलिस यंत्रणा कला केंद्राबाबत बंदचे नियम पाळण्यास बंधन करत नाही, असा प्रश्न विचारण्यात येत आहे.

## सौ मुक्ता आर्दड (मोटे) यांचा शिक्षण रत्न पुरस्काराने उद्या होणार सन्मान

बीड | प्रतिनिधी

महाराष्ट्रराज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मराठवाडा महिला सचिव तथा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या गेवराई तालुकाध्यक्षा तसेच श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मुक्ता दिगंबर आर्दड (मोटे) मॅडम यांना एकता सेवाभावी संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातून शैक्षणिक कार्याच्या गौरवार्थ दिला जाणारा राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार जाहीर झाला. सदर पुरस्कार उद्या दि.२० मे २०२५ मंगळवारी मुंबई मराठी पत्रकार भवन आझाद मैदान महानगरपालिका मार्ग मुंबई येथे शानदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ. मुक्ता दिगंबर आर्दड (मोटे) मॅडम यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

याबाबत अधिक माहिती आहे की, एकता सेवाभावी संस्थेच्या वतीने दरवर्षी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो.



यावर्षी शैक्षणिक क्षेत्रातून दिल्या जाणारा राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मराठवाडा महिला सचिव तथा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या गेवराई तालुकाध्यक्षा श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मुक्ता दिगंबर आर्दड (मोटे) मॅडम यांनी केलेल्या शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल व शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी दिलेला लढा आता पर्यंत केलेले विविध आंदोलन, गोरगरीब विद्यार्थ्यांना केलेली मदत या सर्व बाबींची दखल घेऊन त्यांना शिक्षण क्षेत्रातील बीड जिल्ह्यातील शैक्षणिक कार्याच्या गौरवार्थ हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला. सदर पुरस्कार उद्या दि.२० मे २०२५ मंगळवारी मुंबई मराठी पत्रकार भवन आझाद मैदान महानगरपालिका मार्ग मुंबई येथे एका भव्य दिव्य अशा शानदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ.मुक्ता दिगंबर आर्दड (मोटे) मॅडम यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व मा.आ. श्री अमरसिंह पंडित, जय भवानी शिक्षण संस्थेचे सचिव जयसिंह पंडित व गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री विजयसिंह पंडित, शारदा क्रिडा अकॅडमीचे संचालक श्री रणवीर काका पंडित व गेवराई तालुक्याचे युवा नेतृत्व श्री पृथ्वीराजे (बाळ दादा) पंडित तसेच उत्तरेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव श्री गोपीनाथ घुले, म.राज्य विनाअनुदानित कृती समितीचे उपाध्यक्ष श्री खंडेराव जगदाळे सर यांच्यासह बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे पदाधिकारी, श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शारदा विद्या मंदिरचे मुख्याध्यापक श्री राजेंद्र जगदाळे, मुख्याध्यापक मुरलीधर पवार सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## संत जयगुरु माऊली विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम

बीड | प्रतिनिधी

तालुक्यातील माळापुरी येथील संत जयगुरु माऊली माध्यमिक विद्यालय माळापुरी या शाळेचा नुकत्याच घोषित झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत उज्वल यश मिळवले. या शाळेचा निकाल ९६.२०% टक्के लागला. शाळेतून कु. साक्षी जयराम घवाडे ९२.२०% गुण घेऊन शाळेसह केंद्रात पहिली आहे. कु. सोनाली सुनील परदेशी ८८.२०% गुण घेऊन शाळेतून द्वितीय तर कु. निकिता ज्ञानेश्वर परदेशी हिने ८७.४०% गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळविला.

त्याच बरोबर कु. पुनम अण्णाभाऊ वावरे ८६.४०%, कु. श्रावणी मधुकर डोंगरे ८५.६०%, कु.लक्ष्मी नारायण परदेशी ८४.८०%, कु.श्रद्धा नितीन रंगदळ ८४.४०%, चि.गणेश ज्ञानेश्वर परदेशी ८३.८०%, चि. शेख अरमान रौफ ८२.५०%, चि. शेख नुमान आलम ७८.८०%, कु.पायल अरुण डोंगरे ७६.००%, कु. शेख अकिब मुनीर ७०.००% या प्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व शाळेच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा विद्याताई डोंगरे, शाळेचे मुख्याध्यापक जितेंद्र डोंगरे यांच्यासह शिक्षक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, माळापुरी गावातील शिक्षण प्रेमी नागरिक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सह्याद्री इन्फोटेककडून गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

टाकरवन | प्रतिनिधी

शैक्षणिक दृष्ट्या दहावीची परीक्षा हा महत्त्वाचा टप्पा असतो. येथे घवघवीत यश मिळवणारा विद्यार्थी मेहनतीने अभ्यास केल्यास जीवनात नक्की यशस्वी होतो असे प्रतिपादन मा वी शाळा टाकरवन चे आदर्श शिक्षक दिगंबर तौर यांनी केले. ते दि.१८ रविवार रोजी टाकरवन येथे सह्याद्री इन्फोटेक कडून आयोजित विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यात बोलत होते.

दहावी बोर्ड परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला. टाकरवन माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चांगले गुण घेऊन यश संपादन केले आहे. शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचा टप्पा यशस्वी होणे हे विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे असते.दहावी मध्ये चांगले गुण घेऊन यशस्वी होणाय्रा विद्यार्थीला चांगले मार्गदर्शन मिळाले तर तो जीवनामध्ये यशाचं उंच शिखर गाठतो. यशाचं उंच शिखर गाठताना मागे वळून पाहू नका, असे प्रतिपादन तौर यांनी अध्यक्षीय समारोपात बोलताना केले. टाकरवन माध्यमिक विद्यालयातुन ऊसतोड कामगाराची मुलगी पूजा बंडू जाधव या विद्यार्थिनीने ९४:६०% गुण घेऊन प्रथम क्रमाक मिळवला तर पुनम महादेव तौर या विद्यार्थिनीने ९३:८० % गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला तर अमित राजभाऊ भुंबे या विद्यार्थ्याने ९४:४० % गुण मिळवून यश संपादन केले. या विद्यार्थ्यासह दहावीत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीवर सह्याद्री इन्फोटेक नेहमीच कौतुकाची थाप देईल आणि पुढे मार्गदर्शन करत राहील, असे मत रामेश्वर कोरडे यांनी व्यक्त केले. यावेळी मा वी शाळा सावरागावचे बळीराम कोरडे, मा वी शाळा रामपुरीचे रविद्र विर, कपील अडागळे, लक्ष्मण गरड, बंडुराम गरड, वचिष्ट आठवे, हनुमान शेरे सह विद्यार्थी पालक उपस्थीत होते.






लोकमत जिल्हास्तरीय सरपंच अवॉर्ड २०२५ साठी सरपंच सौ प्रिती अमोल बगलाने काकडहिरा ग्रामपंचायत ला विशेष कार्य अवॉर्ड पुरस्कार भेटल्याबद्दल आरोग्य विभागाचे नितीन महुवाले व मनेंद्र बागलाने आदी यांनी सरपंच सौ प्रितीताई अमोल बागलाने यांचा सत्कार करताना.

# वैद्यनाथ मंदिराचे पौराणिक व प्राचीन महत्व कायम ठेवून विकास कामे व्हावीत : ना. मुंडे

## उपमुख्यमंत्री अजित पवारांनी घेतला तीर्थक्षेत्र विकास योजनेतील कामांचा आढावा; ना. पंकजाताईंनी रोवली होती योजनेची मुहूर्तमेढ

परळी वैजनाथ । प्रतिनिधी
तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातंर्गत वैद्यनाथ मंदिर परिसरात जी कामे सध्या सुरू आहेत, ती दर्जेदार तर व्हावीतच पण त्याचबरोबर मंदिराचे पौराणिक व प्राचीन महत्व जपले जावे अशी सूचना राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केली.



उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे आज परळी दौऱ्यावर होते. ना. पंकजाताई मुंडे हया त्यांच्यासमवेत दौऱ्यात होत्या. सकाळी शहरात आल्यानंतर प्रभू वैद्यनाथाचे त्यांनी दर्शन घेतले. वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या मंदिर परिसरातील तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामांची त्यांनी उप मुख्यमंत्र्यासह पाहणी केली. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातंर्गत सुरू असलेल्या विविध विकास कामांची आढावा बैठक अजित पवार यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृह येथे झाली, त्यावेळी ना पंकजाताई मुंडे यांनी बैठकीत महत्त्वपूर्ण सूचना केल्या. आ. धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह सर्व संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

पंकजाताई मुंडे पालकमंत्री असताना वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडयाची मुहूर्तमेढ रोवली गेली होती.

१३३ कोटी रूपये त्यांनी त्यावेळी मंजूर केले होते. नंतर यात वाढ होऊन २८६ कोटीचा आराखडा मंजूर करण्यात आला. या अंतर्गत सुरू असलेल्या कामांना सध्या वेग आला आहे.

ना. पंकजाताईंनी बैठकीत बोलताना म्हणाल्या, ही कामे दर्जेदार व्हावीत, भक्त निवास, दर्शन मंडप, मंदिर परिसर सुशोभीकरण, यासह भाविक भक्तांना चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात, मंदिराचे पौराणिक व प्राचीन महत्व कायम ठेवून विकास कामे व्हावीत याकरिता खबरदारी घ्यावी अशा सूचना यावेळी पंकजाताई मुंडे यांनी या बैठकीत केल्या.

**भाजप कार्यकर्त्यांकडून अजित पवार यांचे स्वागत**

उपमुख्यमंत्री अजित पवार व ना. पंकजाताई मुंडे यांचे सकाळी ८ वा. हेलिकॉप्टरने शक्तीकुंज वसाहत येथील हेलिपॅडवर आगमन झाले. भाजप सह महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले. भाजपच्या शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, तालुकाध्यक्ष राजेश गिते, बंडू निर्मळ, माजी तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, वैद्यनाथ बॅंकेचे अध्यक्ष विनोद सामत, विजय वाकेकर, संदीप लाहोटी, महादेव इटके, गणेश कराड आदींनी यावेळी त्यांचे स्वागत केले.



# राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याची दुरुस्ती करा : काँग्रेसची मागणी

## पावसाळ्यापूर्वी रस्ता दुरुस्त न केल्यास आंदोलन करणार : होके पाटील

माजलगाव । प्रतिनिधी
माजलगाव शहरातुन गेलेला खामगाव पंढरपूर हा पालखी महामार्ग वारकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेल्या या रस्त्यावर माजलगाव ते तेलगाव दरम्यान अनेक ठिकाणी भेगा पडून रस्ता फाटला असल्याने आपघाताचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे या महामार्गावरील रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष नारायण होके पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन केली.

पुढे दिलेल्या निवेदनात ते म्हणाले, सदरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असून रस्त्यावर मोठ मोठ्या भेगा पडल्यामुळे दुचाकीस्वारांना आपला जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे तर. पावसाळ्यात या पडलेल्या भेगामध्ये पाणी साचल्यास मोठ्या प्रमाणात अपघात होऊन निष्पाप नागरिकांना गंभीर दुखापत किंवा जीव देखील गमवावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> “ एक वर्षापूर्वी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून आ.प्रकाश सोळंके यांनी सत्तेत असूनही रस्ता दुरुस्तीसाठी आंदोलनाचा दिखावा केला. परंतु आता परत हा रस्ता जैसे थै अवस्थेत असताना आ.सोळंके मात्र यावर चकार शब्द बोलत नाहीत.

त्यामुळे पालखी महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव दरम्यानचा रस्ता पावसाळ्यापूर्वी डागडुजी करून वाहन चालकांना भयमुक्त प्रवास करण्यास मदत करावी व अपघात टाळण्याचे काम करावे. नसता लोकहिताचे या प्रश्नावर काँग्रेस पक्षाच्या वतीने मोठं आंदोलन करण्याचा इशारा तालुका अध्यक्ष नारायण होके पाटील, अनु सु वि जि.अ.दत्ता कांबळे, शेख रशीद, विनोद सुरवसे, शेख जानुशा, शेख अहेमद, कृष्णा शिंदे, विठ्ठल कांबळे, बिभीषण साबळे, संदिप भरडकर यांच्यासह कार्यकर्त्यांनी दिला.

# उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे परळी शहरात आगमन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी
आज दि.१९ मे २०२५ रोजी परळी वैजनाथ राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित दादा पवार यांचे परळी वैजनाथ आगमन झाले. आसता त्यांचे सर्व सहकार्याच्या सोबत स्वागत केले. जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार परळी वैजनाथ मतदार संघात येत असून ते श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास कामाचा आढावा घेणार आहे. यांच्यासह परळी वैजनाथ मतदारसंघातील विविध प्रस्तावित व सुरू असलेल्या विविध कामाचा देखील आढावा घेणार असून या पार्श्वभूमीवर तसेच मतदारसंघात सध्या सुरू असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणी अभियानाच्या अनुषंगाने आज परळी वैजनाथ राष्ट्रवादी काँग्रेस चे पदाधिकारी विविध आघाडी व फ्रटल सेलचे सहकारी आधी सर्वांशी आपल्या जगमित्र कार्यालयात बैठक घेऊन चर्चा केली. यावेळी मा.आ. संजय भाऊ दौंड यांच्यासह मतदारसंघातील मतदार संघातील सहकारी उपस्थित होते. केलेल्या कामाचा दादा सह आणि केली.



सर्व कामे दर्जेदार पद्धतीने वेळेत पूर्ण करण्याबाबत दादांनी संबंधितांना निर्देश दिले. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, मंत्री पंकजाताई मुंडेयांच्या सहप्रभू वैजनाथच्या दर्शन घेऊन मनोभावे प्रार्थना केली. यावेळी मंदिर व परिसरात श्री वैजनाथ तीर्थक्षेत्रात विकास आराखड्याच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामाची पाहणी दादा सुरू केली. पालकमंत्री अजित पवार यांच्या समोरच मराठा आंदोलन आक्रमक मुंडे भाऊ बहिणी समोर मराठ्यांचा संताप दौऱ्यात अचानक मराठा बांधवांनी घोषणाबाजी करून अजित पवार यांच्यावर समोर संताप व्यक्त केला.

# चार महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या दुहेरी हत्याकांड प्रकरणातील कुख्यात आरोपीला अंभोरा पोलिसांनी ठोकल्या बेड्या

## अंभोरा पोलिस, अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

आष्टी । प्रतिनिधी
जुन्या वादातून दोघाभावांची हत्या केल्याची घटना १७ जानेवारी रोजी अंभोरा ठाणे हद्दीतील वाहिरा येथे घडली होती. याच गुन्ह्यातील चार महिन्यांपासून अंभोरा पोलिसांना गुंगारा देणारा आरोपी अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखा व अंभोरा पोलिसांनी गोरख नारायण भोसले याला शनिवारी अहिल्यानगर येथून ताब्यात घेत बेड्या ठोकल्या. याच गुन्ह्यातील भोसले टोळीवर मकोका गुन्हा दाखल आहे.

आष्टी तालुक्यातील अंभोरा ठाणे हद्दीतील वाहिरा येथे १७ जानेवारी रोजी रात्री दहाच्या दरम्यान हातोळण येथील तीन सख्खा भावांवर दहा लोकांनी हल्ला केला होता. या हल्ल्यात आजिनाथ भोसले, भरत भोसले या दोन भावांचा जागीच मृत्यू झाला होता. तर कृष्णा भोसले गंभीर जखमी झाला होता. यानंतर पोलीस अधीक्षकांनी या टोळीवर मकोका गुन्हा दाखल केला होता. हत्या केल्यापासून गोरख भोसले अंभोरा पोलिसांना गुंगारा देत परार होता. अंभोरा पोलिस व अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने त्याला शनिवारी रात्री अहिल्यानगर येथून अटक केली.

ही कामगिरी पोलिस अधीक्षक नवनवीन कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हनपुडे याच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस उपनिरीक्षक नामदेव सातव, पोलीस हवालदार बाबूराव तांदळे, पोलीस अंमलदार शिवदास केदार, राजकुमार आघाव, सतिष पैठणे, चालक कृष्णा कन्हेरे यानी केली.





आज टिपू सुलतान युवा मंच चे संस्थापक अध्यक्ष नईम लाला यांच्या लग्न समारंभ संपन्न झाला त्यानिमित्ताने लाला यांना लग्नाची शुभेच्छा देताना राष्ट्रवादीचे जयंत वाघ राष्ट्रवादीचे नेते शेख निजाम समाजसेवक मुसा खान पठाण मुफ्ती वाजेद अश्रफी व शेख इमरान इनामदार दिसत आहेत.

# सकल मातंग समाजाचा उद्या आझाद मैदानावर एल्गार

मुंबई । प्रतिनिधी
आपल्या हक्काच्या आरक्षणासाठी आणि 'अ ब क' वर्गीकरणाच्या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून आलेला सकल मातंग समाज उद्या, दि.२० रोजी मुंबईतील आझाद मैदानावर भव्य आंदोलन करणार आहे. पुणे जिल्ह्यासह परभणी, गंगाखेड, बीड, यवतमाळ, अकोला, सोनपेठ अशा विविध भागांतील समाजबांधवांनी रोजीरोटीच्या शोधात पुण्यात आपला संसार थाटलेला असला, तरी हक्काच्या मागण्या मांडण्यासाठी त्यांनी उद्याचा दिवस मुंबईला जाण्यासाठी राखून ठेवावा, असे कळकळीचे आवाहन आंदोलन समितीकडून करण्यात आले आहे.



हक्कासाठी अभिनय तो कभी नहीं या घोषवाक्याने सज्ज झालेला सकल मातंग समाज आझाद मैदानावर आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आवाज उठवणार आहे. सर्व पुणेकर समाजबांधवांना आवाहन आहे की, आपल्या कामधंद्याला एक दिवसाची विश्रांती देऊन उद्या सकाळी मुंबईकडे कूच करावे.

**– प्रदीप मधुकर घोडे पुणे जिल्हा, लहुजी शक्ती सेना तालुका उपाध्यक्ष शेलु परभणी**

# खांडवीचा रोहित ताराचंद शेजुळ हा गावात प्रथम

बीड । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील खांडवी येथील राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर विद्यालय येथील विद्यार्थी शेजुळ रोहित ताराचंद या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत ९१.४० टक्के घेऊन हा विद्यार्थी यशस्वी झाला. हा विद्यार्थी खांडवी गावामध्ये प्रथम आला आहे. या विद्यार्थ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



यावेळी शाळेचे मुख्याध्यापक केशव तळेकर, मार्गदर्शक बाबासाहेब ढाकणे, शाळेतील शिक्षक वृंद व नातेवाईक यांनी रोहित ताराचंद शेजुळ या विद्यार्थ्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्वत्र कौतुक होत आहे.

# पाकिस्तानसारख्या भिकारी राष्ट्राने भारत देशाशी लढण्याचे स्वप्न बघू नये : आ.धस

आष्टी । प्रतिनिधी
पाकिस्तान आतंकी स्थान झाला आहे. पाकिस्तानचे सैन्यदल हतबल झाले आहे मोठ्या मोठ्या वल्गना करणारे अगर पाणी बंद कर देंगे तो खून की नदिया बहेंगी म्हणणारे पाकिस्तान मंत्रिमंडळ बंकर मध्ये लपून बसले. संपूर्ण जगासमोर पाकिस्तानची नाचक्की झाली आहे. पाकिस्तान सारख्या भिकारी राष्ट्राने भारताशी लढण्याचा विचार ही करू नये. अब नरेंद्र मोदी का नया भारत है, देश मोदी जी के साथ है, और देश सेना के साथ है असे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले. आष्टी येथे त्यांनी आयोजित केलेल्या शौर्य तिरंगा यात्रेच्या समारोपप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर श्रीमती भाकरे श्रीमती काकडे श्रीमती कमल सोंडगे श्रीमती रत्नमाला वाल्हेकर श्रीमती अरुणा नागरगोजे श्रीमती भाग्यश्री राख श्रीमती सीताबाई राख श्रीमती सीताबाई गायकवाड श्रीमती तावरे या केवळ वीर पत्नी वीरमाता यांची उपस्थिती होती प्रमुख पदाधिकारी व देशप्रेमी नागरीक प्रचंड संख्येने आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी श्री.अंकुश खोटे यांनी स्वर्गीय पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची.. ये भारत कोई भूमिका टुकडा नही, ये वंदन की धरती है अभिनंदन की भूमी है. ही कविता ऐकवली. सेवानिवृत्त मेजर श्री.भोसले यांनी प्रास्ताविक केले.. या संपूर्ण शौर्य तिरंगा यात्रेचे सूत्रसंचालन सूत्र बाळासाहेब तळेकर यांनी केले.

पुढे बोलताना आ.सुरेश धस म्हणाले, २२ एप्रिल रोजी काश्मीर मधील पहलगाम परिसरातील बैसरन व्हॅलीमध्ये पर्यटनाला गेलेल्या भारतीय नागरिकांना विशेषतः पुरुषांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घालून मारण्यात आले. कुटुंबीयां देखत, पत्नी समोर, मुलाबाळांवर समोर विशेषतः केवळ पुरुषांना क्रूर पद्धतीने गोळ्या घालून मारण्यात आले ही अत्यंत अमानवी कृती होती त्यामुळे या पाकिस्तान पुरस्कृत आतंकवाद्यांना आणि पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी अत्यंत विचारपूर्वक योजना आखून पाकिस्तानला धडा शिकवला आहे दि.६ मे च्या रात्री अगोदर पहिल्या दिवशी शंभर ते दीडशे दहशतवाद्यांना कंठस्नान घालून दुसऱ्या दिवशी दि.७ मे रोजी केवळ २३ मिनिटांमध्ये पाकिस्तानातील प्रमुख नऊ हवाई तळ उध्वस्त करून



भारतीय सैन्याने पराक्रमाची गाथा लिहिली आहे. अफगाणिस्तान, अरब अमिराती, या मुस्लिम राष्ट्रांनी आणि दोन तीन देश वगळता संपूर्ण जगाने भारताला पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानला केवळ तुर्की आणि अझरबैझान या भिकारी राष्ट्रांनी पाठिंबा दिला आहे. भारतावर यापूर्वी दहशतवादी हल्ले झाले. २६/११ हा भारत देशावरील हल्ला होता, मुंबई शहरात बॉम्ब स्फोट झाले शेकडो नागरिक मारले गेले. परंतु तात्कालीन भारतीय पंतप्रधानांकडून केवळ निषेध व्यक्त झाला. पाकिस्तानला चोख उत्तर देण्यात आले नव्हते. परंतु आता भारत बदललेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्य दलाला सूट दिलेली आहे मोकळीक दिलेली आहे काही दिवसांपूर्वी याच तुर्कस्तानमध्ये भूकंप झाला असता त्यावेळी त्यांना वैद्यकीय मदत देणारा पंतप्रधान मोदींचा भारत देश हाच सर्वात पुढे होता मात्र तुर्की देशाने या मदतीची उपकाराची परतफेड अपकाराने केली असून पाकिस्तानला मदत केली आहे.

पाकिस्तान कडे शस्त्र नाहीत शस्त्र घ्यायला पैसे नाहीत प्रचंड कर्जबाजारी असल्यामुळे आज पाकिस्तानात महागाईने कहर केला असून जीवनावश्यक वस्तू घेण्यासाठी हजारो रुपये मोजावे लागत आहेत पाकिस्तानचे सैन्यदल देखील सैन्यदल राहिले नसून ते अतिरेकी झाले आहेत सैन्यदल आणि अतिरेकी यांच्यात काहीही बदल राहिलेला नाही असे सांगत भारतीय जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही शौर्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली आहे आणि यामध्ये मतदारसंघातील हुतात्मा झालेल्या वीर सैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे असे सांगितले.

या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेले त्रिदल माजी सैनिक संघटना, नागरिक, व्यापारी, विद्यार्थी विद्यार्थिनी, यांचे त्यांनी मनापासून आभार मानले. आष्टीच्या पंचायत समिती येथील हुतात्मा स्मारकापासून हुतात्मा जवानांच्या वीर पत्नी वीर माता यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारत मातीची प्रतिमा असलेला अश्वारूढ रथ लक्ष आकर्षण घेत होता बँड पथकाच्या निनादात देशभक्तीच्या नया भारत का जलवा देखा, पाकिस्तान ने मलबा देखा, हिंद की सेना ने भरी हुंकार.. पाकिस्तान मे मचा हाहा:कार.. घर मे घुसकर मारा है, आतंक का भूत उतारा है, जो हिंदुस्तान से टकरायेगा,चूर चूर हो जायेगा... घर मे घुसकर मारा है, आतंक का भूत उतारा है.. जो हिंदुस्थानको टकरायेगा.. चुरचुर हो जाएगा, सिंदूर का हिसाब चुकाया है, पाकिस्तान को सबक सिखाया है, अशा राष्ट्रभक्तीपर देशप्रेमाने भारलेल्या घोषणांनी आष्टी नगरी दुमदुमून गेली होती.. यावेळी हजारो नागरिक या शौर्य तिरंगा यात्रेत सामील झाले असल्याने संपूर्ण आष्टी शहरातील नागरिकांचे या तिरंगा यात्रेने लक्ष वेधले.

ही संपूर्ण शौर्य तिरंगा यात्रा यशस्वी करण्यासाठी आ.सुरेश धस मित्र मंडळ, त्रिदल सैनिक संघटना, आजी माजी सैनिक यांनी खूप मोठे परिश्रम घेतल्याने ही शौर्य तिरंगा यात्रा यशस्वी झाली. तर या भव्य दिव्य तिरंगा यात्रेत प्रमुख पदाधिकारी, आजी माजी सैनिक यांच्यासह देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT